दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • मंगळवार दि.२ जून २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २६७ • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Tuesday 2 June 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 267 • Pages 4 • Rate 4 Rs

### राज्यात १० जूनपर्यंत मान्सूनची प्रतीक्षाच

**मुंबई**–राज्यातील कडाक्याच्या उन्हापासून हैराण झालेल्या नागरिकांना पावसाची प्रतीक्षा लागून राहिली असली, तरी मान्सूनच्या आगमनाबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. राज्यातील बहुतांश भागात किमान १० जूनपर्यंत मान्सून दाखल होण्याची शक्यता नसल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मात्र, १ जूनपासून सुरू होणाऱ्या आठवड्यात विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रासह अनेक भागांत वादळी पावसाची शक्यता असल्याने हवामानात मोठे बदल होणार आहेत.सध्या राज्यातील हवामान बदलण्यास सुरुवात झाली असून येत्या आठवड्यात त्याचे परिणाम अधिक स्पष्टपणे जाणवतील. प्रामुख्याने खानदेश, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात दुपारनंतर ढगाळ वातावरण निर्माण होऊन काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे

# ८० लाख लाडक्या बहिणी वगळल्या नाहीत!

## ई–केवायसी केलेली एकही महिला लाभापासून वंचित राहणार नाही–मंत्री आदिती तटकरे

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'तून तब्बल ८० लाख महिलांना अपात्र करून योजनेला कात्री लावण्यात आल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. मात्र, राज्यातील ८० लाख लाडक्या बहिणींना योजनेतून वगळण्यात आलेले नाही. ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली एकही पात्र महिला या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सोमवारी दिली. मुंबईत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी विरोधकांचे आरोप खोडून काढत ८० लाखांच्या या आकड्यामागचे नेमके गणित आणि वस्तुस्थिती स्पष्ट केली. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, लाडकी बहीण योजनेतील अर्ज सरसकट बाद करण्यात आलेले नाहीत. थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) करणाऱ्या सरकारच्या प्रत्येक योजनेसाठी ई–केवायसी अनिवार्य असते. लाडकी बहीण योजनेसाठी ही प्रक्रिया गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यापासून सुरू असून, महिलांना वारंवार मुदतवाढ देऊन तब्बल ८ ते १० महिन्यांचा प्रदीर्घ कालावधी देण्यात आला होता. ३० एप्रिलपर्यंत ही अंतिम मुदत होती. त्यामुळे या ८० लाख महिलांमध्ये बहुतांश अशा आहेत, ज्यांनी अद्याप ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही.छाननी प्रक्रियेतील तपशील जाहीर करताना तटकरे यांनी सांगितले की, आयटी विभागाकडून गेल्या साडेदहा महिन्यांचा डेटा मागवण्यात आला होता. त्यानुसार या ८० लाखांच्या आकड्यामध्ये विविध कारणांमुळे अपात्र ठरलेल्या घटकांचा समावेश आहे. वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा अधिक असलेल्या सुमारे साडेअकरा ते बारा लाख महिलांचा यात समावेश आहे. ६५ वर्षांपेक्षा अधिक वय झालेल्या साडेचार ते पाच लाख महिला यातून बाहेर पडल्या आहेत. आरटीओच्या डॅशबोर्डनुसार नावावर चारचाकी वाहन असूनही लाभ घेणाऱ्या सव्वातीन लाख महिलांची नावे समोर आली आहेत. मात्र, 'आमच्या नावावर वाहन नाही' अशी निवेदने ज्या महिलांनी दिली आहेत, त्यांची फेरतपासणी केली जाईल.या योजनेचा लाभ घेणाऱ्या साडेचौदा हजार शासकीय कर्मचारी महिला आढळल्या असून, त्यांच्याकडून आता मानधनाची वसुली सुरू आहे. संजय गांधी निराधार योजना आणि लाडकी बहीण योजना अशा दोन्ही योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांची नावे छाननीतून कट करण्यात आली आहेत. मात्र, त्यांना दोन्हीपैकी एका योजनेचा लाभ पूर्ववत मिळत राहील, असेही तटकरे यांनी सांगितले.



### तांत्रिक अडचणी दूर करून फेरतपासणी सुरू

**ई–केवायसी करूनही काही महिलांचा लाभ तांत्रिक अडचणींमुळे बंद झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यावर बोलताना आदिती तटकरे म्हणाल्या, अशा लाभार्थी महिलांच्या अर्जांची आम्ही फेरतपासणी करत आहोत. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि मंत्रिमंडळासोबत सविस्तर चर्चा सुरू आहे. केवळ तांत्रिक कारणांमुळे कोणत्याही पात्र महिलेचे मानधन थांबणार नाही. गेल्या आठवड्यापासून पात्र महिलांच्या खात्यात फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांचे थकीत हप्ते वितरित करण्याचे काम सुरू झाले आहे. हे वितरण पूर्ण झाल्यानंतरच अपात्र ठरलेल्या महिलांची अचूक आणि अंतिम संख्या स्पष्ट होईल, असे सांगत महिलांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे.**

# खरीप हंगाम २०२५ पीकविमा रक्कम शेतकऱ्यांना तात्काळ मिळावी–खासदार बजरंग सोनवणे यांचा पाठपुरावा

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२५ च्या पीकविम्याची रक्कम तात्काळ मिळावी यासाठी खासदार बजरंग सोनवणे यांनी पुढाकार घेत संबंधित स्तरावर पाठपुरावा सुरू केला आहे.

शेतकरी संघर्ष समितीचे भाई गंगाभीषण थावरे यांनी सादर केलेल्या निवेदनाची दखल घेत खासदार सोनवणे यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले आहे.या संदर्भात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, देशाचे कृषिमंत्री, राज्याचे उपमुख्यमंत्री, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच राज्याचे कृषिमंत्री यांच्या कडे निवेदन सादर करून पीकविमा रक्कम शेतकऱ्यांना तातडीने मिळण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. खासदार बजरंग सोनवणे यांनी सांगितले की,बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या हिताचा हा अत्यंत महत्त्वाचा विषय असून शासन स्तरावर सातत्याने हा मुद्दा मांडला जात आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत आवश्यक तो पाठपुरावा सुरू ठेवला जाईल.शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आपण सदैव सकारात्मक भूमिका घेत असून पीकविमा रक्कम लवकरात लवकर मिळावी यासाठी प्रयत्न सुरू राहतील,असा विश्वास खासदार बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केला आहे.



# पुरुषोत्तमपुरी गोदापात्रात बुडणाऱ्या भाविकास वाचवले;जवानांचा बाजार समितीच्या वतीने सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे अधिकमासानिमित्त सुरू असलेल्या यात्रोत्सवा निमित्त गोदावरी नदीपात्रात स्नानासाठी उतरलेल्या एका भाविकाचा पाण्याच्या खोल भागात जाऊन बुडण्याचा प्रसंग ओढवला होता. मात्र, तेथे कर्तव्यावर उपस्थित असलेल्या होमगार्ड राजू हरिभाऊ पंडित, मुजाहेद उस्मान शेख, सुरेश वैजनाथ भारस्कर या जवानांनी तत्परता दाखवत संबंधित भाविकास सुखरूप बाहेर काढून त्याचे प्राण वाचवले. जवानांच्या या धाडसी आणि समयसूचक कार्याची दखल घेत माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने त्यांचा



सत्कार करण्यात आला. यावेळी सभापती जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे, माजी उपसभापती निळकंठराव भोसले व ग्रामस्थ उपस्थित होते तर बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जवानांच्या शौर्याचे कौतुक करत समाजाप्रती त्यांच्या सेवाभावाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

अधिकमास यात्रोत्सवादरम्यान भाविकांनी नदीपात्रात स्नान करताना आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. सत्कार कार्यक्रमास बाजार समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाटवडगाव येथे 'बी.टी.पवार नगर' चा नामकरण सोहळा उत्साहात संपन्न

## स्वर्गीय बाबुराव टोपाजी पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ परिसराला दिले नाव; ग्रामस्थांची मोठी उपस्थिती




दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शहराच्या अगदी हाकेच्या अंतरावर भाटवडगाव येथील गट नंबर १६० परिसरामध्ये काल, रविवार दिनांक ३१ मे २०२६ रोजी एका विशेष आणि उत्साही वातावरणात बिटी पवार नगर चा नामकरण सोहळा संपन्न झाला. या परिसराला सामाजिक कार्यकर्ते स्वर्गीय बाबुराव टोपाजी पवार यांच्या स्मरणार्थ 'बी. टी. पवार नगर' असे नाव देण्यात आले आहे.

या सोहळ्याप्रसंगी परिसरातील नागरिक, पवार कुटुंबिय आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**स्मृतींना उजाळा आणि गौरव**

स्वर्गीय बाबुराव टोपाजी (बी. टी.) पवार यांनी आपल्या आयुष्यात केलेल्या सामाजिक कार्याची आणि त्यांच्या योगदानाची आठवण म्हणून या परिसराला त्यांचे नाव देण्याचा एकमुखी निर्णय ग्रामस्थांनी घेतला होता. त्यानुसार काल रविवारी विधीवत पूजनाने आणि नामकरणाच्या पाटीचे अनावरण करून या भागाचे 'बी. टी. पवार नगर' असे नामकरण करण्यात आले.स्वर्गीय बाबुराव पवार यांचे विचार आणि त्यांनी दिलेले योगदान समाजासाठी नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. या नामकरणामुळे त्यांच्या स्मृती या परिसरात कायम जिवंत राहतील, अशा भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या.ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण या नामकरण सोहळ्यामुळे गट नंबर १६० परिसरातील नागरिकांमध्ये कमालीचा उत्साह आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पवार नगरमधील तरुण मंडळी आणि ज्येष्ठ नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले. सोहळ्यानंतर उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला आणि कार्यक्रमाची सांगता अत्यंत उत्साहात झाली.

# माजलगावात राजमाता अहिल्याबाई होळकर जयंती उत्साहात व जल्लोषात साजरी

## पिवळ्या ध्वजाचे ध्वजारोहण,महाआरती व अभिवादन कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकमाता राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त माजलगाव शहरातील राजमाता अहिल्याबाई होळकर चौक येथे रविवार, दि. ३१ मे रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात हा जयंती सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी चौक परिसरात आकर्षक रांगोळी काढण्यात आली तसेच फुलांची सजावट करून संपूर्ण परिसर सुशोभित करण्यात आला. जयघोषाच्या वातावरणात राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या अश्वरूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महिलांच्या हस्ते पिवळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी महाआरती करून राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपा नेते माधव निर्मळ यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहनराव जगताप, अरुणराव राऊत, माजी नगराध्यक्ष अशोक तिडके, माजी जिल्हा परिषद प्रा. सदस्य प्रकाश गवते, सुभाषराव गडदे, अण्णासाहेब वगरे, नगरसेवक शरद यादव, ज्ञानेश्वर सरवदे, सरपंच राज अर्जुन, नारायण भले, अविनाश कांडुरे, अशोकराव डोणे, मुक्तीराम आबूज, किसनराव हराळ, प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर, सरपंच शंकर काळे, सतीश डोणे, गणेशराव



होनमाने, ईश्वर खुरपे, कृष्णा देवकते, सत्यनारायण उनवणे, नारायण सातपुते, अर्जुन नाईकनवरे सुग्रीव शिंगाडे, भागवत गायकवाड, अँड . अमोल डोंगरे, अनिल राधे, कांबळे, शंकर गावडे, योगेश कुंडकर, पंडित वगरे, संकेत आबूज प्रल्हाद दळवी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचा, न्यायप्रिय प्रशासनाचा व समाजहितासाठी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे आणि समाजहिताचे कार्य पुढे नेण्याचे आवाहनही करण्यात आले.या जयंती सोहळ्यास महिला, युवक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संपूर्ण परिसर राजमाता अहिल्याबाई होळकर विजय असो च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन स्थानिक कार्यकर्ते आणि नागरिकांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडले.

# संपादकीय

## युद्धात भारताची होरपळ




मध्यपूर्वेत सुरू असलेल्या अमेरिका-इस्त्रायल-इराण संघर्षाचा फटका भारतातील सामान्य नागरिकांना बसत असून पेट्रोल, डिझेलपाठोपाठ सीएनजीचे दरही सातत्याने वाढत आहेत. इंधन दरवाढीमुळे सामान्य माणसाचा घरखर्च कोलमडत चालला आहे. युद्ध लांबत गेले तर भारतासारख्या इंधन आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसमोरील आर्थिक संकट आणखी भीषण होण्याची शक्यता आहे.

अमेरिका, इस्त्रायल, इराण युद्धामुळे इंधनाची सातत्याने दरवाढ होत आहे. पेट्रोल, डिझेलपाठोपाठ सीएनजीच्या दरातही १० दिवसांमध्ये चौथ्यांदा वाढ झाली आहे. इंधनात दरवाढ झाली की, महागाई आपोआप वाढते. महागाईवर नियंत्रण ठेवणे कोणालाच शक्य नाही. युद्धबंदीच्या चर्चा होतात, पुन्हा हल्ले होतात. यामुळे इंधनासाठी अवलंबून असलेले भारतासारखे देश होरपळून चालले आहेत. तोंड दाबून बुक्क्यांचा मार खाण्याची वेळ या देशांवर आली आहे. युद्धाबाबत अमेरिका व इराण कोणीही लवचिक भूमिका घेत नसल्याने युद्ध लांबण्याची शक्यता आहे. जगात कुठेही युद्ध पेटले की त्याची राख सर्वप्रथम सामान्य माणसाच्या चुलीवर पडते. आज नेमके तेच घडत आहे. अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात वाढत चाललेल्या संघर्षाने संपूर्ण जगाला अस्थिरतेच्या खाईत ढकलले आहे. युद्धाच्या बातम्या टीव्हीवर दिसतात, क्षेपणास्त्रांचे आवाज मध्यपूर्वेत घुमतात; पण त्याचे भारतासारख्या विकसनशील देशांना चटके बसतात. कारण युद्ध जिथे होते, तिथे फक्त बॉम्ब पडत नाहीत, तर त्यासोबत जागतिक अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडते. तेलाच्या किमती उसळतात, डॉलर मजबूत होतो, आयात खर्च वाढतो आणि त्याचा थेट फटका सामान्य नागरिकांच्या खिशाला बसतो. भारत आजही मोठ्या प्रमाणावर इंधनासाठी परदेशांवर अवलंबून आहे. कच्च्या तेलाची आयात थांबली किंवा दर वाढले की संपूर्ण अर्थचक्र हादरते. पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीनंतर आता सीएनजीचे दरही दहा दिवसांत चौथ्यांदा वाढले आहेत. ही केवळ आकड्यांची वाढ नाही, तर ती सामान्य नागरिकांच्या जगण्यावर चाललेली आर्थिक चढाई आहे. रोज सकाळी पेट्रोल पंपावर दर बदलतात आणि त्याच वेगाने बाजारातील वस्तूंचे भाव वाढतात. भाजीपाला, दूध, धान्य, बांधकाम साहित्य, वाहतूक, औद्योगिक उत्पादन या सर्वच क्षेत्रांवर या इंधन दरवाढीचा परिणाम होतो.महागाई ही केवळ आर्थिक संज्ञा नाही; ती गरिबाच्या थाळीतून कमी होणारी भाकरी आहे. जेव्हा इंधन महाग होते, तेव्हा ट्रकचे भाडे वाढते, वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा भार शेवटी ग्राहकावर टाकला जातो. त्यामुळे महागाई नियंत्रणाबाहेर जाते. सरकार कितीही आश्वासने देत असले, तरी वास्तव असे आहे की, इंधन दरवाढ झाली की महागाईला लगाम घालणे जवळपास अशक्य बनते. आज भारतातील मध्यमवर्ग आणि गरीब वर्ग अक्षरशः तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करत आहे. पगार वाढत नाहीत, रोजगाराची स्थिती स्थिर नाही, पण खर्च मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. शहरांमध्ये कामावर जाणाऱ्या सामान्य कर्मचाऱ्यापासून ते ग्रामीण भागातील शेतकऱ्यापर्यंत प्रत्येकजण या महागाईच्या आगीत भाजत आहे. या सर्व परिस्थितीमागे मध्यपूर्वेतील युद्धजन्य वातावरण मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहे. अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणविरोधात घेतलेली आक्रमक भूमिका आणि त्याला इराणकडून मिळणारे प्रत्युत्तर यामुळे परिस्थिती अधिक धोकादायक बनत आहे. युद्धबंदीच्या चर्चा होतात, शांततेच्या घोषणा केल्या जातात; पण दुसऱ्याच दिवशी पुन्हा हल्ले सुरू होतात. यामुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता निर्माण होते. तेल उत्पादक प्रदेशात तणाव वाढला की कच्च्या तेलाच्या पुरवठ्याबाबत भीती निर्माण होते आणि लगेच आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर वाढतात. अमेरिकेला तिची महासत्ता टिकवायची आहे, इस्त्रायलला स्वतःची सुरक्षा सिद्ध करायची आहे आणि इराणला झुकायचे नाही. या तीन शक्तींच्या अहंकाराच्या संघर्षात भारतासारख्या देशांची आर्थिक कोंडी होत आहे. युद्धात सहभागी नसतानाही भारताला त्याची किंमत मोजावी लागत आहे. कारण भारताकडे तेलाचे प्रचंड साठे नाहीत. देशाला ऊर्जा हवी असेल, उद्योग चालवायचे असतील, वाहतूक सुरळीत ठेवायची असेल तर आयात केलेल्या तेलावर अवलंबून राहावेच लागते.युद्ध जितके लांबेल, तितका भारतावरचा आर्थिक दबाव वाढणार आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया कमजोर झाला की, आयात अधिक महाग होते. सरकार कर कमी करून नागरिकांना काहीसा दिलासा देण्याचा प्रयत्न करू शकते; पण त्यालाही मर्यादा आहेत. कारण सरकारलाही महसूल हवा असतो. परिणामी सामान्य नागरिक दोन्हींकडून भरडला जातो, एकीकडे महाग इंधन आणि दुसरीकडे वाढती महागाई. आज परिस्थिती इतकी गंभीर बनली आहे की, लोकांच्या आर्थिक नियोजनाचा पूर्णतः बोजवारा उडाला आहे. सीएनजी दरवाढीचा सर्वात मोठा फटका रिक्षाचालक, टॅक्सीचालक आणि छोट्या वाहतूक व्यावसायिकांना बसत आहे. त्यांचे उत्पन्न वाढत नाही; पण खर्च मात्र प्रचंड वाढतो आहे. शेवटी तेही भाडेवाढ करतात आणि त्याचा भार पुन्हा सामान्य माणसालाच सहन करावा लागतो. सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे या संकटावर कोणाकडेही ठोस उपाय दिसत नाही. युद्ध थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना निष्प्रभ ठरत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठका होतात, निवेदने दिली जातात; पण प्रत्यक्षात युद्धबंदी घडताना दिसत नाही. अमेरिका आणि इराण दोघेही माघार घेण्याच्या मनःस्थितीत नाहीत. इस्त्रायलची भूमिका देखील अधिक आक्रमक होत चालली आहे. त्यामुळे हा संघर्ष दीर्घकाळ सुरू राहण्याची भीती वाढत आहे. भारताने आता या परिस्थितीकडे केवळ प्रेक्षक म्हणून पाहून चालणार नाही. दीर्घकालीन ऊर्जा धोरण अधिक मजबूत करावे लागेल. पर्यायी ऊर्जा स्रोत, इलेक्ट्रिक वाहनांचा प्रसार, सौरऊर्जा, जैवइंधन आणि स्थानिक ऊर्जा उत्पादन यावर आक्रमक गुंतवणूक करण्याची वेळ आली आहे. अन्यथा प्रत्येक आंतरराष्ट्रीय युद्धानंतर भारताला अशाच आर्थिक संकटांना सामोरे जावे लागेल. जगातील महासत्ता आपापल्या राजकीय आणि सामरिक स्वार्थासाठी संघर्ष करत राहतील; पण त्याची किंमत भारतातील सामान्य माणूस रोज पेट्रोल पंपावर, बाजारात आणि घरखर्चात चुकवत राहणार आहे. हे युद्ध फक्त मध्यपूर्वेत सुरू नाही, तर ते भारतातील प्रत्येक घराच्या अर्थसंकल्पावर चालले आहे. इंधन दरवाढ आणि महागाईच्या रूपाने सामान्य नागरिक रोज या युद्धाचे घाव सहन करत आहे आणि जर अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांनी आपली आक्रमक भूमिका बदलली नाही, तर येणारे दिवस आणखी भयावह ठरू शकतात.

# रामशेठ ठाकूर यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवसा निमित्त शेलघर येथे कृतज्ञता सोहळा दणक्यात साजरा

## महेंद्रशेठ खऱ्या अर्थाने माझा वारसा चालवतोय-रामशेठ ठाकूर

## रामशेठ यांनी हाताला बोट धरून मला राजकारणात आणले-महेंद्रशेठ घरत

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

माजी खासदार रामशेठ ठाकूर यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त शेलघर येथे शुक्रवारी (ता. २९) 'कृतज्ञता सोहळा' एम. जी. ग्रुपतर्फे दणक्यात साजरा करण्यात आला. रामशेठ हे सुप्रसिद्ध उद्योजक असल्याने त्यांचा भव्य सत्कार बांधकाम व्यावसायातील डेल्टा ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर नितीन गाजीपारा, टुडे ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर ब्रदेशभाई शहा, सोनाली रिॲलिटीचे मॅनेजिंग डायरेक्टर मयुरेश चौधरी यांच्या हस्ते एम. जी. ग्रुपचे प्रमुख महेंद्रशेठ घरत यांनी करून दाखवला. यावेळी रामशेठ ठाकूर यांना गुरू समजून आयुष्याची वाटचाल करणारे महेंद्रशेठ घरत यांनी गुरुदक्षिणा म्हणून रोलॅक्सचे अनोखे घड्याळ भेट दिले आणि गुरु-शिष्याचे नाते अनोखे असते हे दाखवून दिले.



सत्काराला उत्तर देताना माजी खासदार रामशेठ ठाकूर म्हणाले, महेंद्रशेठ यांनी दातृत्वाचा वसा माझ्याकडून घेतला आहे; परंतु तो एक पाऊल पुढे जाऊन माझ्यापेक्षा वेगळे समाजोपयोगी काम करतोय. घरे, बंगले, गाड्या आपल्या सहकाऱ्यांना देऊन त्यांचेही आयुष्य उजळत आहे. जे मलाही जमले नाही. 'सुखकर्ता' बंगल्यावरून दिनदुबळ्यांची, गरजवंतांची तो ज्या पद्धतीने सेवा करतोय, याचा मला रास्त अभिमान आहे. त्याने आज कामगार क्षेत्रात जागतिक पातळीवर आदरयुक्त दबदबा निर्माण केला आहे. बैठका व पर्यटनाच्या माध्यमातून त्याने संपूर्ण जग पालथे घातले आहे. हे कौतुकास्पद आहे. त्यामुळे राजकारणात आमचे प्रवाह वेगळे आहेत, पण नातेसंबंधांत ते कधीही आडवे येणार नाहीत, याची काळजी आम्ही दोघांनीही घेतली आहे.

यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत रामशेठ ठाकूर यांच्या जुन्या आठवणींत रमले होते. ते म्हणाले, रामशेठ ठाकूर हे शेलघरचे जावई आहेत. दिवंगत ज. आ. भगत साहेबांची कन्या शकुंतलाताई त्यांच्या सहचारिणी आहेत. त्यामुळे शेलघर गावावर त्यांचे विशेष प्रेम आहे. भगत साहेबांच्या ओसरीत असलेला रामशेठ ठाकूर साहेबांचा फोटो पाहत मी मोठा झालो. पुढे ते शिक्षक झाले, तेव्हा ते वाशीला राहत होते. त्यावेळी मी त्यांच्या घरी बीएमटीसीने जायचो. प्रशांत आणि परेशही तेव्हा लहान होते. त्यामुळे छान गप्पागोष्टी रंगायच्या. रामशेठ यांनी एकदा आम्हाला चेंबूरला चित्रपट पाहायलाही नेले होते, अशी आठवणही महेंद्रशेठ यांनी यावेळी सांगितली. गेल्या ५० वर्षांपासून त्यांना मी पाहत आलोय. त्यांनी मला अक्षरशः हाताला बोट धरून राजकारणात आणले. माझ्या आजच्या वाटचालीत त्यांचा खूप मोठा वाटा आहे. त्यामुळे त्यांचे ऋण माझ्यावर आहेत. ते सर्वच बाबतीत मोठे आहेत, पण आजही माझे ऐकतात. त्यामुळे राजकीय वादळे कितीही आली तरी आमचे कौटुंबिक संबंध कायमच मधुर राहतील, असा विश्वासही महेंद्रशेठ घरत यांनी बोलून दाखवला. सध्या मी कामगारांच्या हक्कांच्या लढाईसाठी पूर्वनियोजित बैठकांसाठी जिनिव्हाच्या दौऱ्यावर जात आहे. त्यामुळे २ जून या रामशेठ ठाकूर साहेबांच्या वाढदिवशी मी प्रत्यक्ष भारतात नाही. त्यामुळे त्यांचा कृतज्ञता सोहळा आयोजित केला आहे.

यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या वाढदिवसानिमित्त काढण्यात आलेल्या 'सुखकर्ता' विशेषांकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. महेंद्रशेठ घरत जिनिव्हा दौऱ्यावर जाण्यापूर्वी त्यांनी आपल्या तीन सहकाऱ्यांना फोर व्हीलर भेट दिल्या. त्यांच्या चाव्या रामशेठ ठाकूर, उद्योजक मयुरेश चौधरी यांच्या हस्ते दिल्या आणि आपल्या सहकाऱ्यांच्या चेहऱ्यावर महेंद्रशेठ घरत यांनी हास्य फुलविले. नाना गडकरी यांनी आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांचे मनोरंजन केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य ॲड. अविनाश ठाकूर, मो. का. मढवी गुरुजी आणि घरत परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# जर्नालिस्ट मीडिया असोसिएशन(महाराष्ट्र) पदाधिकारी आणि मेंबर्सची प्रशिक्षण कार्यशाळा गोवंडी चेबूर येथे संपन्न





**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई येथे शनिवार दिनांक ३० मे २०२६ रोजी जर्नालिस्ट मीडिया असोसिएशन(महाराष्ट्र) पदाधिकारी आणि मेंबर्सची प्रशिक्षण कार्यशाळा मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी गच- चे सर्व पदाधिकारी आणि मेंबर्स मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. स्टेट इन्चार्ज सुधीर शर्मा यांनी जर्नलिस्ट अँड मीडिया असोसिएशनने महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या पत्रकारांसाठी २० लाख रुपयांचा विमा आणि विशेष प्रशिक्षणाची घोषणा केली आहे. तसेच न्यूज मीडिया रजिस्ट्रेशन साठी विशेष सहकार्य मिळणार असल्याचे सांगितले. राज्य प्रभारी सुधीर शर्मा, नवनिर्वाचित महाराष्ट्र अध्यक्ष संजय निराळे, सरचिटणीस संजय पवार, वरिष्ठ उपाध्यक्ष दत्तात्रय सूर्यवंशी, राज्य सल्लागार सुचिता बिराजदार, उपसचिव कमर शाह, उपाध्यक्ष लालचंद यादव- भोलानाथ शर्मा-सनी मेहरोल, सह कोषाध्यक्ष इरशाद शेख- विकास पाटील, ठाणे जिल्हा इन्चार्ज संदीप बिराजदार, हीना खान आणि जेएमएचे इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष अतिथी असलेले आमदार अबू आझमी यांनी प्रसारमाध्यमांच्या आव्हानात्मक परिस्थितीचा उल्लेख केला आणि पत्रकार माध्यम संघटनेची सकारात्मक मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# अखेर हरवलेली मुलगी शोधण्यास दिवा (मुंब्रा) पोलिसांना यश

## १ हजार पेक्षा अधिक CCTV फुटेज तपासले



**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

दिवा परिसरातून हरवलेली ८ वर्षीय साक्षी विजयकुमार पांडे या हरवलेली मुलीस शोधण्यास दिवा (मुंब्रा) पोलिसांना यश मिळाले आहे. सहायक पोलीस आयुक्त प्रिया डमाळे तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा (मुंब्रा) पोलीस स्टेशनच्या पथकाने गेली ३ ते ४ दिवस अहोरात्र मेहनत घेतली. या शोध मोहीमे दरम्यान दिवा ते बदलापूर परिसरातील १००० हून अधिक उउढत कॅमेरे तपासण्यात आले.

मुलगी हरवल्याची माहिती समोर आल्यानंतर संपूर्ण दिवा शहरात चिंतेचे वातावरण पसरले होते. मात्र पोलिस प्रशासनाने तात्काळ हालचाली करत विशेष पथके तयार केली आणि विविध भागांमध्ये शोधमोहीम राबवली. दिवा शहरातील नागरिकांनी देखील मोठ्या प्रमाणावर सहकार्य करत मुलीचा शोध घेण्यासाठी मदत केली. पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दिवस-रात्र धावपळ करत सातत्याने तपास सुरू ठेवला आणि अखेर मुलगी सुखरूप सापडल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास टाकला.या शोध मोहीमे दरम्यान वपोनि अनिल शिंदे,पोलीस निरीक्षक पगार, सपोनि वसंत खतेले, सपोनि कोळेकर, सपोनि केदार, सपोनि सावंत, सपोनि जाधव, सपोनि माने, पोलीस उप निरीक्षक शर्मा मॅडम तसेच दिवा आणि मुंब्रा पोलीस स्टेशनची संपूर्ण टीमसह नागरिकांच्या सहकार्यामुळे आणि पोलिसांच्या अथक प्रयत्नांमुळे एका चिमुकलीला सुरक्षितपणे कुटुंबापर्यंत पोहोचवण्यात यश आले.

# प्रजाजनासाठी धडपडणाऱ्या अहिल्यादेवी लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**९९२३६२०९१९**

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, महाराजे, सम्राट आणि राज्यकर्ते होऊन गेले. काहींनी युद्धे जिंकून इतिहास घडविला, तर काहींनी आपल्या पराक्रमाने साम्राज्य विस्तारले. परंतु जनतेच्या मनावर राज्य करणारे आणि प्रजेला आपल्या कुटुंबाप्रमाणे जपणारे राज्यकर्ते फार थोडे होऊन गेले. अशा मोजक्या लोककल्याणकारी राज्यकर्त्यांमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. सत्ता, संपत्ती आणि वैभवाच्या शिखरावर असूनही ज्यांनी जनतेच्या सुख-दुःखाला आपल्या जीवनाचे ध्येय मानले, अशा अहिल्यादेवी आजही लोकस्मृतीत 'मातोश्री' म्हणून जिवंत आहेत. अहिल्यादेवींचे जीवन म्हणजे संघर्ष, त्याग, दूरदृष्टी आणि लोककल्याण यांचे अद्वितीय उदाहरण होय. चौंडी या छोट्याशा गावात जन्मलेल्या या कन्येने पुढे माळवा प्रदेशाच्या राज्यकारभाराची धुरा समर्थपणे सांभाळली. पती खंडेराव होळकर यांचे युद्धात निधन झाल्यानंतर तत्कालीन समाजरचनेनुसार त्यांच्यावर सती जाण्याचा दबाव होता. परंतु सासरे मल्हारराव होळकर यांनी त्यांना सती जाण्यापासून परावृत्त केले. हा निर्णय केवळ एका स्त्रीचे जीवन वाचवणारा नव्हता, तर भारतीय इतिहासाला एक आदर्श शासिका देणारा ठरला.मल्हारराव होळकर यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यादेवींनी प्रशासन, अर्थकारण, सैनिकी व्यवस्थापन आणि न्यायदान यांचे बारकावे आत्मसात केले. त्यामुळे सासरे आणि पुत्राच्या निधनानंतर राज्यावर संकटाचे ढग दाटून आले असतानाही त्यांनी धैर्याने नेतृत्व स्वीकारले. अनेक सरदार आणि राजकीय प्रतिस्पर्ध्यांचा विरोध झुगारून त्यांनी माळव्याच्या गादीवर बसण्याचा अधिकार मिळवला. त्या काळात स्त्रीने राज्यकारभार करणे हेच अनेकांना मान्य नव्हते; मात्र आपल्या बुद्धिमत्ता, कार्यक्षमता आणि धाडसाच्या बळावर त्यांनी सर्व विरोधकांना शांत केले. अहिल्यादेवींच्या राज्यकारभारातील सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्यांची प्रजावत्सलता. आजच्या लोकशाहीतही अनेकदा सामान्य नागरिकाला सत्तेच्या दारापर्यंत पोहोचणे कठीण जाते. परंतु अहिल्यादेवी दररोज खुला दरबार भरवत असत. कोणताही प्रजाजन थेट त्यांच्यापर्यंत आपली व्यथा मांडू शकत असे. न्याय मिळवण्यासाठी त्याला दलालांची किंवा शिफारशींची गरज नव्हती. न्याय हा त्यांच्या राज्याचा आत्मा होता.त्यांच्या न्यायप्रियतेच्या अनेक कथा आजही लोकपरंपरेत सांगितल्या जातात. सुभेदार तुकोजीराव होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्यालाही शिक्षा देण्यात आली. सत्ता, नातेसंबंध किंवा पद यापेक्षा न्याय मोठा आहे, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. आजच्या काळात सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या लोकांवर कारवाई करण्यास प्रशासन अनेकदा टाळाटाळ करते. अशा वेळी अहिल्यादेवींची न्यायनिष्ठा अधिकच प्रेरणादायी वाटते. अहिल्यादेवींनी राज्यकारभार केवळ महसूल गोळा करण्यापुरता मर्यादित ठेवला नाही. त्यांनी शेतकरी, व्यापारी, कारागीर आणि सामान्य जनतेच्या विकासाला प्राधान्य दिले. शेतकरी सुखी तर राज्य सुखी हा विचार त्यांनी प्रत्यक्षात उतरविला. शेतकऱ्यांवरील अन्यायकारक कर कमी केले. तलाव, विहिरी आणि पाणीपुरवठ्याच्या सुविधा निर्माण केल्या. दुष्काळाशी मुकाबला करण्यासाठी जलसंधारणाची कामे केली. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करण्यासाठी गोपालनाला प्रोत्साहन दिले.त्यांच्या काळात व्यापार आणि उद्योगधंद्यांनाही उत्तेजन मिळाले. महेश्वर हे शहर त्यांनी केवळ राजधानी म्हणून विकसित केले नाही, तर ते वस्त्रोद्योग, संस्कृती आणि विद्वत्तेचे केंद्र बनवले. आज प्रसिद्ध असलेल्या महेश्वरी साड्यांच्या परंपरेला चालना देण्याचे श्रेयही त्यांनाच जाते. रोजगारनिर्मिती आणि स्थानिक अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आधुनिक आर्थिक धोरणांनाही मार्गदर्शक ठरावेत असे आहेत. अहिल्यादेवींची दूरदृष्टी केवळ अर्थकारणापुरती मर्यादित नव्हती. सामाजिक सुधारणांच्या बाबतीतही त्या आपल्या काळाच्या कितीतरी पुढे होत्या. सतीप्रथेच्या विरोधात त्यांनी लोकजागृती केली. धर्मग्रंथांचा आधार घेऊन सतीप्रथेला कोणताही शास्त्रीय आधार नसल्याचे लोकांना पटवून दिले. विधवांच्या हक्कांचे संरक्षण केले. दत्तक घेण्याच्या प्रक्रियेत अडथळे आणणाऱ्या अधिकाऱ्यांना फटकारले. स्त्रियांच्या सन्मानासाठी आणि स्वावलंबनासाठी त्यांनी अनेक निर्णय घेतले.आज स्त्रीसक्षमीकरणाची चर्चा मोठ्या प्रमाणात होत असली तरी अठराव्या शतकात एका स्त्रीने इतक्या व्यापक सामाजिक सुधारणा करणे ही अभूतपूर्व बाब होती. त्यामुळेच अहिल्यादेवी या केवळ राजमाता नव्हत्या, तर त्या सामाजिक परिवर्तनाच्या अग्रदूत होत्या. ज्ञान, संस्कृती आणि शिक्षण यांच्याबाबतही त्यांची भूमिका अत्यंत सकारात्मक होती. अनेक विद्वान, पंडित, शास्त्री, कीर्तनकार, वैद्य आणि अभ्यासकांना त्यांनी आश्रय दिला. हस्तलिखित ग्रंथांचे जतन आणि निर्मिती यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शाळा सुरू केल्या. ज्ञान ही समाजाच्या प्रगतीची खरी शक्ती आहे, याची त्यांना पूर्ण जाणीव होती.धर्माविषयी त्यांची श्रद्धा खोल होती; मात्र ती अंधश्रद्धा नव्हती. त्यांनी भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांचा विकास केला. काशी, सोमनाथ, द्वारका, रामेश्वर, हरिद्वार, उज्जैन, अयोध्या यांसारख्या ठिकाणी घाट, मंदिरे, धर्मशाळा आणि यात्रेकरूंसाठी सुविधा उभारल्या. परंतु धर्माच्या नावाखाली भेदभाव किंवा दडपशाही त्यांनी कधीच स्वीकारली नाही. त्यांचा धर्म म्हणजे लोकसेवा आणि मानवतेची उपासना होता.

# आ.किसनराव वानखेडे यांच्याकडून महागाव तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतीची पाहणी; तात्काळ पंचनाम्यांचे निर्देश



दैनिक वादळ वार्ता
**महागाव | प्रतिनिधी**

महागांव तालुक्यातील सवना आणि परिसराला अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याने झोडपून काढले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे परिसरातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून, विशेषतः केळी उत्पादक शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी केळीच्या बागा मुळासकट उन्मळून पडल्याने संपूर्ण शेती पिक जमीनदोस्त झाले आहे. केळी पिक व इतर पिकाचे खूप मोठे झाले असल्यामुळे शेतकरी वर्ग पूर्णपणे हवालदिल झाला असून शेतकऱ्या समोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. शेतकऱ्यांच्या या कठीण प्रसंगात आमदार किसनराव वानखेडे यांनी तात्काळ दखल घेत संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांसह सवना परिसरातील नुकसानग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी स्वतःशेतकऱ्यांच्या शेतात जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला आणि पीडित शेतकऱ्यांना धीर दिला. अनेक शेतकरी कुटुंबांचे संपूर्ण उत्पन्न केवळ केळीच्या पिकावरच अवलंबून असल्याने, त्यांचे झालेले नुकसान भरून काढणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांना नुकसानग्रस्त शेतीचे तात्काळ कारवाईचे पंचनामे करण्याचे निर्देश दिले. आमदार किसनराव वानखेडे म्हटले शेतकरी हा देशाचा कणा आहे. संकटाच्या या कठीण काळात शासन आणि प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय मदतीचा लाभ लवकरात लवकर मिळवून देण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही युद्धपातळीवर पूर्ण केली जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.अधिकारी व ग्रामस्थांची उपस्थिती

या पाहणी दौऱ्यादरम्यान आमदार वानखेडे यांच्यासोबत तहसीलदार अभय मस्के, तालुका कृषी अधिकारीअंकुश टकले, पोलीस उपनिरीक्षक अमोल राठोड, तलाठी अंकुश उईके, ग्रामसेवक संदीप पाटील उपस्थित होते. तसेच परिसरातील प्रमुख नागरिक व शेतकरी बांधव, कार्यकर्ते उपस्थित होते दिपक आडे, सुरेश नरवाडे, शिवाजीराव देशमुख, निलेश नरवाडे, रमेश सावंत, शुभम गरूड, नितीन जाधव, विनायक सरसमकर, गोपालराव सरसमकर, श्रीराम बोंढारे, सुधीर देशमुख, अवधूत शिवारकर, पिंटू बेलखेडे, मारोतराव देशमुख, उदय करोडकर, किसनराव नरवाडे आणि ज्ञानेश्वर चव्हाण, उपस्थित होते.

## चंद्रपूरकरांच्या पाणी हक्कासाठी शिवसेना रस्त्यावर; २ जूनला महानगर पालिकेवर पाणी हक्क उठाव मोर्चा

### पाणीटंचाईवर तातडीने उपाययोजना न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा



दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर | प्रतिनिधी**

शहरातील विविध प्रभागांमध्ये निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने नागरिकांच्या पाणी हक्कासाठी आक्रमक भूमिका घेतली असून, मंगळवार दि. २ जून २०२६ रोजी चंद्रपूर महानगरपालिकेवर 'पाणी हक्क उठाव आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. अनेक भागांत नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक व सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. या गंभीर प्रश्नाकडे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे.

यासंदर्भात शिवसेना पदाधिकाऱ्यांनी महानगरपालिका आयुक्तांना निवेदन सादर करून शहरातील पाणी समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती. पाणीटंचाईग्रस्त भागांत नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुरू करणे, अतिरिक्त पाणी टँकरची व्यवस्था करणे, आवश्यक ठिकाणी सिंटेक्स टाक्या बसविणे, अमृत योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे, तसेच गरजेनुसार नवीन बोरवेल उभारणे आदी मागण्या प्रशासनाकडे करण्यात आल्या होत्या. मात्र अद्याप कोणतीही समाधानकारक कार्यवाही झालेली नसल्याने शिवसेनेने जनआंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.शिवसेनेतर्फे मंगळवार दि. २ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातून महानगरपालिका भवन, गांधी चौकपर्यंत 'पाणी हक्क उठाव' मोर्चा काढण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून नागरिकांच्या मूलभूत हक्काच्या प्रश्नावर प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे शिवसेनेने स्पष्ट केले आहे.या आंदोलनात शहरातील महिला, युवक, सामाजिक संघटना तसेच सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख ड. युवराज धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेविका केळझरकर, युवा सेना जिल्हाप्रमुख शैलेश केळझरकर यांच्या सहकार्याने शिवसैनिक गोमती शारदा मनोहर पाचभाई यांनी केले आहे.प्रशासनाने नागरिकांच्या पाणी प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही शिवसेनेच्या वतीने देण्यात आला आहे.

## महागाई, खतदरवाढ आणि नीट पेपरफुटी विरोधात देवळीत युवा संघर्ष मोर्चाचा एल्गार

### केंद्र शासनाविरोधात निषेध रॅली; घोषणांनी दणाणला शहर परिसर

दैनिक वादळ वार्ता
**देवळी | प्रतिनिधी**

वाढती महागाई, पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमती, रासायनिक खतांच्या दरवाढीमुळे शेतकऱ्यांवर वाढलेला आर्थिक भार तसेच नीट पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ युवा संघर्ष मोर्चाच्या वतीने २९ मे रोजी देवळी शहरात भव्य निषेध रॅली काढण्यात आली. नगराध्यक्ष किरण ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. युवा संघर्ष मोर्चा कार्यालयापासून सुरू झालेली रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत आठवडी बाजार चौकात पोहोचली. यावेळी केंद्र शासनाच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात




आली. पेट्रोल-डिझेल दरवाढीच्या निषेधार्थ कार्यकर्त्यांनी प्रतीकात्मक स्वरूपात चारचाकी वाहनाला धक्का देऊन आंदोलन केले. या अनोख्या आंदोलनाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.यावेळी बोलताना आंदोलनकर्त्यांनी वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक कंबरडे मोडल्याचा आरोप केला. खतांच्या वाढलेल्या किमतींमुळे शेतकरी अडचणीत सापडला असून नीट पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ झाल्याची टीका करण्यात आली. या सर्व प्रश्नांवर केंद्र शासनाने तातडीने ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणीही करण्यात आली.

या आंदोलनात किरण ठाकरे यांच्यासह प्रविण कात्रे, गौरव खोपाळ, प्रविण खाडे, गौतम पोपटकर, संदीप दिघीकर, मनोज नागपुरे, मंगेश वानखेडे, शैलेश पुनसे, निलेश बोटफोले, इरफान शेख, आसिफ इकबाल, मनीष पेटकर, खुशाल साळुंके, अविनाश धुर्वे, जयंत बिजवार, महेश खाडे, बबलू बादशाह, सुधीर भगत, अमित मुरार, स्वप्नील मदणकर, शाहबाज शेख, देवेंद्र येनूरकर, शुभम मोरणकर, अक्षय शृंगारे, मोहन खोपाळ, वैभव भोयर, कुणाल खोपाळ, शाम रुद्रकार, भगवंत मुरार, हंसराज देवगिरकर, बॉबी पंचभाई यांच्यासह युवा संघर्ष मोर्चाचे अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## देहगाव-स्टेशन परिसरात इंधन काळाबाजाराचा पर्दाफाश

### पोलीसांच्या धाडीत २,७३० लिटर डिझेल-पेट्रोल जप्त;२.८५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

दैनिक वादळ वार्ता
**वधा | प्रतिनिधी**

देहगाव-स्टेशन परिसरात सुरू असलेल्या इंधनाच्या अवैध साठवणूक व काळाबाजाराविरोधात सावंगी पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल २,७३० लिटर डिझेल व पेट्रोलचा साठा जप्त केला. या कारवाईत सुमारे २ लाख ८५ हजार ७५९ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, परिसरात खळबळ उडाली आहे.गोपनीय माहितीच्या आधारे सावंगी पोलिसांनी संशयित ठिकाणी छापा टाकला. यावेळी मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कॅनमध्ये डिझेल व पेट्रोल साठवून त्याची अवैध विक्री केली जात असल्याचे उघड झाले. कारवाईदरम्यान ५४ प्लास्टिक कॅनमधील १,६२० लिटर डिझेल आणि ३७ प्लास्टिक कॅनमधील १,११० लिटर पेट्रोल असा एकूण २,७३० लिटर इंधनसाठा जप्त करण्यात आला.

छाप्याची माहिती मिळताच संबंधित आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विशेष पथके नियुक्त केली असून पुढील



तपास सुरू आहे.

देहगाव-स्टेशन परिसरातून विविध पेट्रोलियम कंपन्यांचे टँकर नियमितपणे ये-जा करतात. या भागात इंधनाच्या अवैध साठवणूक व काळाबाजाराबाबत यापूर्वीही तक्रारी समोर आल्या होत्या. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात इंधन जप्त होण्याची ही पहिलीच मोठी कारवाई असल्याचे बोलले जात आहे.

पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. सावंगी पोलीस ठाण्याचे ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे, पोलीस उपनिरीक्षक सतीश दुधाने तसेच पोलीस पथकाने कारवाईत सक्रिय सहभाग घेतला.

या धाडसी कारवाईमुळे इंधन काळाबाजार करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, जिल्ह्यातील अवैध इंधन व्यवसायावर पोलिसांनी कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

## किनगावराजात क्रांतीसूर्य महात्मा फुले चित्ररथाचे उत्स्फूर्त स्वागत

### महात्मा फुले, सावित्रीबाई,शाहू महाराज आणि डॉ.आंबेडकरांच्या विचारांचा संदेश घराघरांत पोहोचविण्याचा उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
**किनगावराजा | प्रतिनिधी**

: क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे राज्यभर फिरत असलेल्या भव्य चित्ररथाचे गुरुवारी किनगावराजा येथे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. चित्ररथ गावात दाखल होताच ग्रामस्थांनी जल्लोषपूर्ण वातावरणात स्वागत करून महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले.माजी मंत्री छगन भुजबळ यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या या विशेष चित्ररथामध्ये क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आकर्षक प्रतिकृती उभारण्यात आल्या आहेत. याशिवाय पुण्यातील ऐतिहासिक भिडे वाडा आणि देशातील मुलींच्या पहिल्या शाळेची हुबेहूब प्रतिकृती साकारण्यात आल्याने नागरिकांचे विशेष



लक्ष वेधून घेतले.महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण, स्त्री-सक्षमीकरण, सामाजिक समता आणि अस्पृश्यता निर्मूलनासाठी केलेले कार्य समाजापर्यंत पोहोचावे तसेच त्यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार व्हावा, या उद्देशाने हा चित्ररथ राज्यभर फिरविण्यात येत आहे. चित्ररथाच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या जीवनकार्याची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याबरोबरच युवकांमध्ये सामाजिक जाणीवा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.चित्ररथाच्या स्वागतावेळी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामस्थांनी घोषणाबाजी करत महात्मा फुले यांच्या कार्याला अभिवादन केले. अनेकांनी चित्ररथासमोर छायाचित्रे काढून या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी उपक्रमाचे स्वागत केले.यावेळी समता परिषदेचे वसंतराव मगर, उत्तमराव झोरे, शिवाजीराव काळुसे, सर्जेराव झोरे, राधाकिसन हरकळ, सुनील झोरे, प्रमोद काकड, सखाराम हरकळ, गणेश काकड, दिनेश झोरे, ज्ञानेश्वर कायंदे, दीपक साळवे, प्रसाद कुलकर्णी, सचिन मांटे, मधुकर साळवे, राजू राजे, गजानन वानखेडे, विनोद हरकळ, शिवानंद मुंढे, सर्जेराव गोरे, भीमराव खाडे, महेश वल्टे, विजय इंगळे, निलेश हरकळ, सुरज लिंबेकर, गजानन हरकळ, संतोष काकड, उद्धव झोरे, समाधान मुंढे, अजय जाधव, पवन झोरे, वैभव हरकळ, संतोष झोरे, सलीम शेख, शिवाजी हरकळ, प्रशांत झोरे, नंदकिशोर हरकळ, बालू केवट, सुरज जाधव यांच्यासह शेकडो ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज तालुक्यातील कोरडेवाडीच्या विशाल यादवची मुंबई पोलीस दलात निवड ;ग्रामस्थां कडून जंगी सत्कार संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील कोरडेवाडी येथील भूमिपुत्र विशाल दशरथ यादव याची मुंबई पोलीस दलात पोलीस शिपाई पदावर निवड झाल्याबद्दल कोरडेवाडी ग्रामस्थ आणि नातेवाईकांच्या वतीने त्याचा जाहीर नागरी सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील तरुणाने आपल्या कष्टाच्या आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केल्यामुळे संपूर्ण परिसरातून त्याचे कौतुक होत आहे.

**मान्यवरांच्या उपस्थितीत रंगला सोहळा**

यासत्कार समारंभासाठी राजकीय,सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रा तील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून विशाल ला भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यामध्ये प्रामुख्याने शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड,ज्ञानदीप अकॅडमीचे संचालक दत्ता दराडे सर, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते गोवर्धनभोसले, डॉ.धनराज पवार,अंकुश कलाने स्थानिक लोक प्रतिनिधी सरपंच नंदूबाई कोरडे,शिक्षण व इतर क्षेत्रातील मान्यवर हनुमंत गित्ते सर,हिराबाई पवार मॅडम,घाडगे सर मुंबई पोलीस दलातील सहकारी स्वप्निल चिंचकर मुंबई पोलीस गावातील ज्येष्ठ व प्रतिष्ठित नागरिक गंगाधर महाराज यादव, सुरेश यादव,अनिल कोरडे,दत्ता वरपे,किशोर देशमुख,अशोक भोसले, उत्तरेश्वर यादव,अशोक वरपे,नामदेव पवार, सतीश धूमक,बाजीराव कोरडे,मारुती तेरवे, मदन यादव,पोपटसावंत, जेजेराम पवार,हनुमंत हावळे,दत्ता यादव आदि मान्यवर उपस्थित होते.

ग्रामीण भागातील तरुणांसाठी आदर्श यावेळी बोलताना मान्यवरांनी विशालच्या संघर्षाचे कौतुक केले. ग्रामीण भागात राहून, सोयी-सुविधांचा अभाव असतानाही केवळ कठोर परिश्रम आणि सातत्याच्या जोरावर विशालने मिळवलेले हे यश इतर तरुण तरुणीं साठी नक्कीच प्रेरणा दायी ठरेल,असा सूर यावेळी उमटला.

विशालने मिळवलेले यश हे केवळ त्याचे नसून संपूर्ण कोरडेवाडी गावाचा गौरव आहे. त्याच्या या यशामुळे गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे,अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या. यासत्कार सोहळ्यासाठी कोरडेवाडी व परिसरा तील नागरिक,तरुण वर्ग तसेच विशालचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करून सांगता करण्यात आली.सर्व उपस्थितांनी विशाल यादव आणि त्याच्या कुटुंबीयांचे पुष्पहार घालून व पेढे भरवून अभिनंदन केले.



# माजलगाव तालुक्यातील मोगरा येथील बालकाची बुद्धिबळ स्पर्धेत धडाकेबाज कामगिरी

## साडेपाच वर्षाच्या वल्लभ कुलकर्णीची राष्ट्रीय स्पर्धेसाठी दावेदारी

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**



पुणे येथे सात वर्षाखालील मुलांच्या बुध्दीबळ राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धा ३० व ३१ मे रोजी पुणे येथील सिंहगड इन्स्टिटयूट वाडगाव येथे संपन्न झाली. यात माजलगाव तालुक्यातील मोगरा येथील वल्लभ अमोल कुलकर्णी (मोगरेकर) आठ पैकी सहा सामने जिंकल्याने राष्ट्रीय स्पर्धेत त्याची दावेदारी निश्चित मानली जात आहे .

त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

या स्पर्धेमध्ये संपूर्ण राज्यभरातून १७८ मुलांनी सहभाग नोंदवला होता या स्पर्धेमध्ये जिल्हास्तरीय निवड झालेल्या स्पर्धकांमध्ये लढत होऊन महाराष्ट्र राज्य प्रतिनिधित्व साठी निवड होणार होती या स्पर्धेमध्ये वल्लभ मोगरेकर ने आठ पैकी सहा सामने जिंकून धडाकेबाज कामगिरी केली आहे. त्याचा पहिला सामना आंतरराष्ट्रीय मनांकन खेळाडू मुंबई सिटी चा इव्हान दुबे सोबत होता संघर्षपूर्ण या सामन्यात तो पराभूत झाला परंतु त्यानंतरच्या सलग तीन सामन्यांमध्ये विविध जिल्हातुन निवड झाल्याले खेळाडू सोबत विजय मिळवून आपले आव्हान कायम ठेवले होते.

दुसऱ्या दिवशीच्या पहिला सामना पालघर खेळाडू विरांश बारी सोबतचा सामना गमावल्यानंतर ही नंतरचे सलग तीनही सामने त्याने जिंकले.या स्पर्धेमध्ये एकूण आठ पैकी सहा सामने जिंकणारा सर्वात छोटा म्हणजे साडेपाच वर्षीय खेळडू वल्लभ कुलकर्णी होता. एकूण स्पर्धेकामधून त्याने २० मध्ये त्याने स्थान पटकवले .

जून महिना अखेर नागपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय निवड स्पर्धेमध्ये आपली कामगिरी निश्चितपणे चांगली करण्यासाठी त्याचा संकल्प दृढ झाला आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# 'वादळ वार्ता'च्या बातमीचा दणका

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील ऐतिहासिक आणि सीमावर्ती भाग असलेल्या शेळगाव (नृसिंह) परिसरातील एअरटेल ५जी नेटवर्कच्या बोजवारा उडालेल्या सेवेबाबत 'दैनिक वादळ वार्ता'ने वृत्त प्रसिद्ध करताच, एअरटेल कंपनीला अखेर जाग आली आहे. या भागातील त्रस्त ग्राहक आणि पत्रकार मारोती कुडकेवार यांनी पुराव्यासह दाखल केलेल्या तक्रारीची कंपनीने अधिकृत नोंद घेतली असून, ६ जून २०२६ पर्यंत सेवा सुधारण्याचे आश्वासन दिले आहे.

'वादळ वार्ता'च्या बातमीचा दणकाशेळगाव परिसरात ५जी चे महागडे रिचार्ज करूनही ग्राहकांना साधे कॉलिंग आणि इंटरनेट मिळेनासे झाले होते. 'एअरटेलची सेवा आयसीयूमध्ये' या मथळ्याखाली 'वादळ वार्ता'ने वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे आणि कंपनीचे लक्ष वेधले होते. या बातमीनंतर सीमावर्ती भागातील नागरिकांनी एअरटेल विरोधात संताप व्यक्त केला होता.एअरटेल कंपनीने या बातमीची दखल घेत ग्राहक मारोती कुडकेवार यांच्या ७३८५३२४९३५ या क्रमांकावरून नेटवर्क समस्येबाबत अधिकृत तक्रार नोंदवण्यात आली आहे. कंपनीने ३१-१००००१४०२७९०१ हा सेवा विनंती क्रमांक जारी केला असून, ६ जून २०२६ पर्यंत या समस्येचे निवारण करून अपडेट देण्याचे लेखी आश्वासन मॅसेजद्वारे दिले आहे.

कंपनीने तक्रार तर नोंदवून घेतली आहे, परंतु प्रत्यक्षात ६ जूनपर्यंत शेळगाव परिसरातील नेटवर्क सुधारणार की कंपनी नेहमीप्रमाणे ग्राहकांना केवळ आश्वासनाचे गाजर दाखवणार, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
संपादक : अजय भांगे

## देगलूरच्या सीमावर्ती भागात 'एअरटेल'ची सेवा आयसीयूमध्ये ५ जी रिचार्ज करूनही ग्राहक वाऱ्यावर

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

देशभरामध्ये 'डिजिटल इंडिया' आणि हाय-स्पीड ५जी इंटरनेटचा मोठा गाजावाजा केला जात असताना, प्रत्यक्ष ग्रामीण आणि सीमावर्ती भागात मात्र ग्राहकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. देगलूर तालुक्यातील ऐतिहासिक आणि सीमावर्ती भाग असलेल्या शेळगाव (नृसिंह) परिसरामध्ये 'एअरटेल' टेलिकॉम कंपनीच्या विस्कळीत आणि निकृष्ट दर्जाच्या सेवेमुळे हजारो ग्राहक त्रस्त झाले आहेत. ५जी चे महागडे प्लॅन्स रिचार्ज करूनही ग्राहकांना हक्काची सेवा मिळत नसल्याने, कंपनी ग्राहकांची उघड फसवणूक करत असल्याचा आरोप आता येथील नागरिक करत आहेत.

**महागडे रिचार्ज, पण सेवा शून्य..?**

शेळगाव नृसिंह या मुख्य गावांसह परिसरातील शेखापूर, शेवाळा, तमलूर, उमर सांगवी आणि शहापूर सर्कल येथील हजारो शेतकरी, व्यापारी, नोकरदार आणि विद्यार्थ्यांनी दरमहा शेकडो रुपये खर्चून '५जी अनलिमिटेड'चे प्लॅन्स रिचार्ज केले आहेत. मात्र, या परिसरात पाऊल ठेवताच मोबाईल स्क्रीनवरील ५जी नेटवर्क गायब होते. त्याऐवजी अत्यंत क्षीण आणि संथ गतीचे ४ जी नेटवर्क दिसते. हे ४ जी नेटवर्कही दिवसातून शेकडो वेळा पूर्णपणे बंद पडत असल्याने नागरिकांचा बाहेरील जगाशी संपर्क तुटत आहे.कॉल सुरू असतानाच अचानक आवाज कट होणे (कॉल ड्रॉप), इंटरनेट न चालणे यामुळे व्यापारी आणि नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. बँकेचे ऑनलाईन व्यवहार, विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण आणि शासकीय कामे एअरटेलच्या या ढिसाळ कारभारामुळे ठप्प झाली आहेत.

कायदेशीर तरतुदींनुसार, ग्राहकांकडून ठरलेली पूर्ण रक्कम आगाऊ घेऊनही त्यांना निकृष्ट दर्जाची सेवा देणे किंवा सेवा न देणे, हा 'ग्राहक हक्क संरक्षण कायदा २०१९' च्या कलम २(११) अंतर्गत सेवेतील त्रुटी आणि कलम २(४७) नुसार अनुचित व्यापारी प्रथेचा गंभीर गुन्हा ठरतो. एअरटेल कंपनी ग्राहकांच्या कायदेशीर हक्कांचे उघड उल्लंघन करत असल्याचा सूर कायदेतज्ज्ञांमधून उमटत आहे.

या व्यावसायिक फसवणुकीविरोधात शेळगाव नृसिंह येथील गावकऱ्यांनी आणि सजग नागरिकांनी एकत्र येत एअरटेल कंपनीचा जाहीर निषेध केला आहे. कंपनीने तातडीने या भागात नवीन मोबाईल टॉवर उभारून ५जी सेवा सुरळीत करावी, अन्यथा कंपनीविरुद्ध ग्राहक न्यायालयात सामूहिक दाद मागण्याचा आणि तीव्र आंदोलन करण्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी दिली आहे.



01 Jun 2026 - Page 2 | epaper.vadalvarta.com
Powered by softisky | 9764331134

# रुग्ण व नातेवाईकांसाठी वॉटर फिल्टर विथ कुलरचे दान

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**




डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुणालय, विष्णुपुरी येथे १ जुन रोजी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना स्वच्छ व आरोग्यदायी पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने वॉटर फिल्टर विथ कुलर दान करण्यात आला आहे.भीषण उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर रुग्ण व नातेवाईकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन हॅपी क्लब व नांदेड शांतता कमिटी यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. ड. मोहम्मद कासिम वसीम बाबुसेठ तसेच हॅपी क्लबचे अध्यक्ष मोहम्मद शोहेब यांच्या सहकार्याने बालरोग विभागातील वॉर्ड क्रमांक ७ साठी हा वॉटर फिल्टर विथ कुलर रुग्णालयास प्रदान करण्यात आला.याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार कापसे, बालरोग विभागप्रमुख डॉ. किशोर राठोड, उपवैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवानंद देवसरकर, अधिसेविका बी. आर. मुदीराज यांच्यासह कर्मचारी व रुग्णनातेवाईक उपस्थित होते.

यावेळी अधिष्ठाता डॉ. देशमुख यांनी समाजातील दाते, सामाजिक संस्था आणि सुजाण नागरिकांनी सामाजिक दायित्वाच्या भावनेतून रुग्णालयाला रुग्णोपयोगी साहित्य उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन केले. अशा उपक्रमांमुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना थेट लाभ मिळत असून अधिकाधिक दाते पुढे येऊन आरोग्यसेवेसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

देण्यात आलेल्या साहित्याची योग्य देखभाल व व्यवस्थापन करण्याच्या सूचनाही संबंधित वॉर्डाला देण्यात आल्या. तसेच रुग्ण व नातेवाईकांनी उपलब्ध सुविधांचा जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले.या उपक्रमासाठी रुणालय प्रशासनाच्या वतीने राजरत्न केळकर व कुणाल महागडे (समाजसेवा अधीक्षक) यांनी संस्थेशी समन्वय साधून अधिष्ठाता यांच्या मार्गदर्शनाखाली वॉटर फिल्टर उपलब्ध करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले. रुणालय प्रशासनाने दात्यांचे आभार मानून भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

# सुरक्षा कर्तव्याच्या ठिकाणी झालेला सेवानिवृत्तीचा कार्यक्रम अद्वितीय-उपमहापौर दशरथ भगत

**दैनिक वादळ वार्ता**
**बेलापूर । प्रतिनिधी**



शासकीय सेवेतून वयोमर्यादेनुसार अनेकजण सेवेतून निवृत्त होत असतात. त्यांचा हृद्य निरोप समारंभ हा त्या आस्थपनेतील हॉल मध्ये होत असतो. मात्र कर्मचारी ज्या ठिकाणी कर्तव्य बजावीत असतो त्याच कार्यालया बाहेर निसर्गाच्या नैसर्गिक सावलीच्या मंडपात सेवानिवृत्ती सारखा सोहळा होणे भाग्यदायक व अद्वितीय आहे असे मनोगत नवी मुंबईचे उपमहापौर दशरथ भगत यांनी सिडको अंतर्गत सुरक्षा युनिट मधील महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक महामंडळातील सुरक्षा रक्षक श्री. शंकरराव जयवंती मुकुंद घाग यांच्या निरोप समारंभ प्रसंगी बेलापूर येथे व्यक्त केले.

राज्य शासनाच्या अख्त्यारितील महाराष्ट्र सुरक्षा रक्षक महामंडळ सेवेतून ३१ वर्ष कर्तव्यदक्ष सेवा बजावल्या नंतर निवृत्त झालेल्या शंकरराव घाग यांच्या निवृत्ती समारंभ सोहळा ३१ मे रोजी खारघर हिल्स येथील प्रवेशद्वारावर एन्ट्री पॉईंट येथे निसर्गाच्या सानिध्यात संपन्न झाला. यावेळी नवी मुंबईचे उपमहापौर दशरथ भगत यांच्यासह राजकीय, सामाजिक, पत्रकारिता, व्यापार - उद्योग क्षेत्र, पर्यावरण प्रेमी नागरिक यांसह सिडको व सुरक्षा रक्षक मंडळातील ठाणे व आणि रायगड जिल्ह्यातील अधिकारी कर्मचारी तसेच निवृत्त झालेले सुरक्षा रक्षक घाग यांचे कुटुंबीय व नातेवाईक अनेक उपस्थित होते.

# शिवसेना मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या नांदेड उत्तर जिल्हा समन्वयकपदी शिवश्री डॉ बालाजी पेनुरकर दक्षिण जिल्हासमन्वयकपदी अक्षय वट्टमवार यांची निवड



**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**

पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे साहेब यांच्या आदेशाने वशिवसेना मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे समन्वयक दिलीप घुगे यांच्या नेतृत्वात, शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, शिवसेना जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, सहसंपर्कप्रमुख दयाल गिरी, महानगरप्रमुख मनोज यादव, तालुकाप्रमुख सुनिल पाटील कदम, शहरप्रमुख अर्जुन ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले यावेळी माधव पांचाळ, मनोज काकडे , सौरभ देवकते ,राजू यादव व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'बाप्या'च्या स्पेशल शोमध्ये अभिनेते गिरीश कुलकर्णी यांचा जाहीर सत्कार

**दैनिक वादळ वार्ता**
**वाघोली । प्रतिनिधी**



संवेदनशील विषयावर भाष्य करणाऱ्या 'बाप्या' या मराठी चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, रविवारी कोथरूड येथील सिटी प्राईड थिएटरमध्ये आयोजित स्पेशल शोदरम्यान चित्रपटाचे अभिनेते व निर्माते गिरीश कुलकर्णी यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. प्रेक्षकांसह त्यांच्या मित्रपरिवाराने हा सत्कार करून चित्रपटाच्या धाडसी विषयाचे कौतुक केले.मानवी शरीरात होणारे बदल आणि विशेषतः ट्रान्सजेंडर समुदायाच्या भावविश्वावर भाष्य करणारा 'बाप्या' हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. चित्रपटातील आशय आणि गिरीश कुलकर्णी यांनी साकारलेली भूमिका यामुळे चित्रपटाची सर्वत्र चर्चा होत आहे.

या प्रसंगी गिरीश कुलकर्णी यांचे इंजिनिअरिंग शिक्षणातील जुने सहकारी विशेष उपस्थित होते. पुरनमल लाहोटी गव्हर्नमेंट पॉलीटेकनिक, लातूरचे माजी विद्यार्थी आनंद पंडित, बाळासाहेब चव्हाण, प्रशांत सरनाईक, संजय चोरडिया, धनंजय कुलकर्णी, अरिफ बांगी आणि राजाभाऊ नलगे यांनी एकत्र येत त्यांचा सत्कार केला. चित्रपटात गिरीश कुलकर्णी यांनी अनिल/अन्या तर राजेश्री देशपांडे यांनी शैलजा/शैलेश ही भूमिका साकारली आहे. याशिवाय देवकी दफ्तरदार, श्रीकांत यादव आणि आर्यन मेंगजी यांनीही महत्त्वपूर्ण भूमिका निभावल्या आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन समीर तिवारी यांनी केले असून निर्मिती मुक्तक तेलंग आणि समीर तिवारी यांची आहे.

सत्कार स्वीकारल्यानंतर गिरीश कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानत 'बाप्या' हा चित्रपट कुटुंबासोबत थिएटरमध्ये जाऊन पाहण्याचे आवाहन केले. समाजाला सकारात्मक आणि संवेदनशील संदेश देणारा हा चित्रपट असल्याची प्रतिक्रिया उपस्थित प्रेक्षकांनी व्यक्त केली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077